# इतिहास (G-3)
# (२०व्या शतकातील जगाचा इतिहास १९१४-१९९२)

## T.Y.B.A.

## अनुक्रमणिका


**१. संकल्पनात्मक अभ्यास** [redacted]

१.१ भांडवलशाही

१.२ आर्थिक साम्राज्यवाद

१.३ हुकूमशाही

१.४ साम्यवाद

१.५ समाजवाद

१.६ नाझीवाद

१.७ फॅसिस्टवाद

१.८ शीतयुद्ध

१.९ अलिप्ततावद

१.१० जागतिकीकरण

१.११ स्त्रीवाद

१.१२ मानवतावाद

**२. पहिले जागतिक महायुद्ध** [redacted]

२.१ पहिल्या जागतिक महायुद्धाची कारणे

२.२ पहिल्या जागतिक महायुद्धाची परिणाम

२.३ पॅरिसचा शांतता तह (१९१९)

२.४ राष्ट्रसंघ

## ३. रशियन राजक्रांती

३.१ रशियन राज्यक्रांतीची सामाजिक-आर्थिक व राजकीय पार्श्वभूमी

३.२ लेनिनचे योगदान आणि नवे आर्थिक धोरण

३.३ स्टॅलिनचे योगदान आणि पंचवार्षिक योजना

३.४ रशियन राज्यक्रांतीचे महत्त्व

## ४. हुकूमशाहीचा उदय

४.१ इटली

४.२ जर्मनी

४.३ तुर्कस्तान

## ५. जागतिक महामंदी

५.१ जागतिक महामंदीचे स्वरूप

५.२ जागतिक महामंदीची कारणे

५.३ जागतिक महामंदीचे परिणाम

## ६. दूसरे महायुद्ध

६.१ दुसऱ्या महायुद्धापूर्वीची परिस्थिती

६.२ दुसऱ्या महायुद्धाची कारणे

६.३ दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात आणि व्याप्ती

६.४ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

६.५ संयुक्त राष्ट्रसंघ

## ७. महासत्तांचा उदय

७.१ अमेरिका आणि रशिया

७.२ स्टार वॉर

## ८. तिसरे जग

८.१ अलिप्ततावादी चळवळीत भारताची भूमिका

८.२ सार्क

८.३ ओपेक

## ९. जागतिकीकरणाकडे वाटचाल ९.१–९.२४

९.१ शीतयुद्धाचा शेवट आणि सोव्हिएत संघाचे विघटन

९.२ उदारकिरण

९.३ गॅट करार आणि जागतिक व्यापार संघटना

९.४ मूलतत्त्ववाद एक जागतिक समस्या (दहशतवाद)

★★★

T.Y.B.A. (G-3)

प्रकरण पहिले

संकल्पनात्मक अभ्यास

① भांडवलशाही - इंग्लंडमध्ये १७ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन वितरण व उपभोग व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडून आले. यंत्राच्या साहाय्याने उत्पादन होऊ लागले आणि यातूनच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला. भांडवलशाही ही एक सामाजिक राजकीय विचारप्रणाली आहे या व्यवस्थेत उत्पादन आणि वितरणाची साधने खाजगी स्वरूपाची असतात उद्योगांमध्ये गुंतवणूक केली जाते या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या नफ्याला अनुसरून बाजारात पुनर्गुंतवणूक केली जाते भांडवलशाहीचा उदय युरोपात झाला नंतर जगभर प्रसार झाला ब्रिटिशांनी अनेक उद्योगात आपले भांडवल गुंतवले व भारतातही भांडवलशाहीचा उदय झाला भांडवलशाही ही केवळ एक उत्पादन पद्धती नसून ती एक विचारप्रणाली आहे

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलदार हा महत्वाचा घटक मानला जातो भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादनाची सर्व साधने ही खासगी मालकीची असतात उत्पादनासंबंधी कोणत्याही प्रकारच्या प्रश्नासंबंधी भांडवलदार स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात त्यावर सरकारचे कोणत्याही प्रकारचे निर्बंध राहत नाहीत.

मागणी व वस्तुचा पुरवठा यांचा मेळ घालून भांडवलदार आपल्याला किती नफा प्राप्त होईल यावरून वस्तूची किंमत निर्धारीत करीत असतात त्यामुळे उत्पादन प्रक्रियेवर ग्राहकांचा मोठा पगडा असतो

भांडवलशाहीमुळे संपत्तीचे केंद्रीकरण होऊन गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण झाले त्यामुळे दोन वर्गातील आर्थिक दरी वाढत जाऊन सामाजिक विषमता समाजात निर्माण झालेली दिसून येते भांडवलशाहीमुळे राष्ट्रीय उत्पादनात वाढ होऊन देशाचा विकास होतो. भांडवलशाहीमुळे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतर होते त्यामुळे शहरात अनेक प्रश्न निर्माण होतात उदा. राहण्याचा प्रश्न, इ.

(२) आर्थिक साम्राज्यवाद – औद्योगिक क्रांतीने साम्राज्यवादाला जन्म दिला आर्थिक क्षमतेच्या जोरावर एखाद्या गरीब राष्ट्रावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करणे म्हणजे आर्थिक साम्राज्यवाद होय. साम्राज्यवादी राष्ट्र हे गरीब व कमकुवत राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर आपली वर्चस्वामार्फत नियंत्रण ठेवत असतात थोडक्यात आर्थिक साम्राज्यवादाचा अर्थ असा होतो की, एखादे राष्ट्र व्यापारामार्फत दुसऱ्या राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करणे. आजचे साम्राज्यवादी राष्ट्र हे दुसऱ्या राष्ट्राचे आर्थिक शोषण करीत असतात आजच्या युगात डॉलरचा साम्राज्यवाद व तेल साम्राज्यवाद ही आर्थिक साम्राज्यवादाची उदाहरणे आहेत.

(३) हुकूमशाही – राजकीय व्यवस्थेचा एक भाग म्हणजे हुकूमशाही होय. प्रत्येक कालखंडात हुकूमशाही कमी प्रमाणात आढळत होती. २० व्या शतकात साम्यवादी फॅसिस्ट, नाझी या सत्तांनी कोणत्या देशांवर हुकूमशाही गाजवली हुकूमशाही म्हणजे अशी एक शासनव्यवस्था जेथे राजकीय, सामाजिक, आर्थिक अधिकारांचे पूर्ण केंद्रीकरण केवळ एक व्यक्ती व त्या व्यक्तीशी एकनिष्ठ असणाऱ्या मोजक्या व्यक्तींच्या हाती झालेले असते हुकूमशाहीत मानवी मूल्यांची उपेक्षा, व्यक्तिस्वातंत्र्यास विरोध केला जातो व्यक्तीपेक्षा राष्ट्राला अधिक महत्त्व प्रदान केले जाते सत्ताविकेंद्रीकरणाला विरोध केला जातो थोडक्यात हुकूमशाही म्हणजे प्रमुख शासनकर्त्याचा शब्द हाच प्रमाण शब्द व कायदा होय.

(४) साम्यवाद – कार्ल मार्क्सला ~~साम्राज्य~~ साम्यवादाचा जनक म्हणतात साम्यवादावरील कार्ल मार्क्सच्या विचारसरणीला 'मार्क्सवाद' असे म्हणतात ज्या समाजपद्धतीत सर्व उत्पादन साधने व मालमत्ता यांवर समाजाची मालकी असते आणि संपत्तीचा

उपभोग सर्व नागरिक आपल्या गरजेप्रमाणे घेऊ शकतात अशा वर्गविहीन पद्धतीला साम्यवाद म्हणतात. समाजवादाचा अंतिम टप्पा म्हणजे साम्यवाद होय. साम्यवादात राष्ट्रीयत्वा व समानतेला महत्त्व दिले गेले. मार्क्सचा साम्यवाद राज्यसंस्थेला तीव्र विरोध करतो कारण राज्यसंस्था हे गरीबांचे शोषण करणारे श्रीमंतांच्या हातातील एक साधन आहे. साम्यवादी तत्त्वानुसार क्रांतिद्वारे भांडवलशाही नष्ट करणे आणि समाजातील लोकांची आर्थिक पिळवणूक थांबविणे हा आहे. साम्यवादात लोकशाही मान्य नाही. उलट कामगारांच्या हुकूमशाहीचा पुरस्कार केला.

(5) समाजवाद :- प्लेटो व समाजवादी विचारांचा आद्य उद्गाता होता. त्याने अशा शासक वर्गाची कल्पना मांडली आहे की, ज्याच्याजवळ स्वतःची कोणतीही खासगी मालमत्ता असणार नाही. सर्व वस्तू सामूहिक मालकीच्या असतील. समाजवाद ही एक कामगारांची चळवळ असून या चळवळीद्वारे समाजातील सर्व घटकांचे शोषण थांबविण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचबरोबर उत्पादन घटकांचे वितरण चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी समाजवाद प्रयत्नशील असतो. समाजवाद म्हणजे "उत्पादन वितरणाच्या मूलभूत साधनांची सामूहिक मालकी आणि लोकशाही व्यवस्थापन यांच्याद्वारे शोषण नष्ट करणे व हे तिचे प्रयोजन असते.

भांडवलशाहीमध्ये नफा या उद्दिष्टामुळे मजुरांचे शोषण होऊ लागले त्यामुळे मजुरांमध्ये असंतोष निर्माण होणे स्वाभाविक होते. यातून समाजवादाचा उदय झाला. भांडवलशाहीचा नाश, उत्पादनावर समाजाची मालकी, श्रमाला महत्त्व ही समाजवादाची उद्दिष्टे होय. समाजवादाचा विकास घडवून आणण्यात विविध विचारवंतांचे योगदान आहे उदा- प्लेटो, सेंट सायमन, फोरियर, लुई ब्लँक इ.

GOODLUCK Page No.
Date

## (6) नाझीवाद —

हिटलरने 'जर्मन कामगार संघामध्ये' प्रवेश 1919 मध्ये केला. यानंतर 1920 मध्ये या संघाचे राष्ट्रीय समाजवादी कामगार संघ या पक्षात रुपांतर झाले हा पक्ष म्हणजेच 'नाझीपक्ष' होय. तर नाझीवाद म्हणजे हिटलरने 1920 मध्ये नाझी पक्षाची स्थापना केली हिटलरच्या मते जर्मन हाच एक शुद्ध आर्यवंश आहे त्यामुळे या आर्यवंशाला जगावर आपले आधिपत्य गाजविण्याचा अधिकार आहे या विचारामुळेच नाझीवाद पुढे आला 1920 मध्ये नाझी पक्षाची स्थापना झाल्यानंतर 1924 मध्ये हिटलरला कैद झाली कैदेत असतानाच त्याने 'माईन काम्फ' (माझा संघर्ष) हे आत्मचरित्र लिहिले या आत्मचरित्रात त्याने नाझी पक्षाची ध्येय - धोरणे स्पष्ट केली यालाच नाझीवाद असे म्हणतात.

नाझीवादाची तत्वे (1) आर्यवंश सर्वश्रेष्ठ (2) राज्य म्हणजे सर्व काही (3) व्यक्तीस्वातंत्र्यास विरोध (4) लोकशाहीच्या तत्वांचा अस्वीकार (5).

थोडक्यात नाझीवाद ही हिटलरप्रणीत विचारसरणी आहे या विचारसरणीत राष्ट्राला अधिक महत्व देण्यात आल्यामुळे जनतेच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा येऊन जर्मनीत हिटलरची हुकूमशाही सुरु झाली होती.

## (7) फॅसिस्टवाद

फॅसिस्टवादी विचारप्रणाली ही व्यक्तिस्वातंत्र्य - विरोधी होती. या विचारप्रणालीनुसार व्यक्ती ही राज्यापुढे दुय्यम मानली होती.

युद्धप्रियता, आक्रमक राष्ट्रवाद, आर्थिक स्वयंपूर्णता असलेली विचारधारा म्हणजे फॅसिस्टवाद होय.

पहिल्या महायुद्धानंतर विजेत्या राष्ट्रांकडून इटलीची अवहेलना झाली यामुळे इटलीतील जनतेत असंतोष पसरला या असंतोषाला प्रस्थापित लोकशाही सरकार शांत करू शकले नाही आणि इटलीत फॅसिस्टवाद या एका नव्या विचारसरणीचा उदय झाला

फॅसिस्टवादामध्ये राष्ट्राला महत्त्व देण्यात आलेले आहे फॅसिस्टवादाचे प्रमुख तत्त्व म्हणजे साम्यवादाला विरोध आहे आला फॅसिस्टवाद हा विषमतेवर भर देताना दिसतो सामर्थ्य वाढविण्यासाठी शेजारी असलेल्या दुर्बल राष्ट्रांवर आक्रमण करणे ह्या तत्वावर फॅसिस्टवाद आधारित आहे फॅसिस्टवाद एकाच नेतृत्वावर विश्वास व्यक्त करतो फॅसिस्टवादामध्ये प्रखर राष्ट्रवादाला महत्त्व प्रदान केलेले आहे साम्यवादाबरोबरच लोकशाहीला विरोध हे देखील फॅसिस्टवादाचे प्रमुख तत्त्व मानले जाते

## (8) शीतयुद्ध

जगाच्या इतिहासात 1945 नंतर शीतयुद्ध ही संकल्पना उदयास आली अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर जो तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले त्यास शीतयुद्ध म्हटले जाते. या दोन्ही राष्ट्रामध्ये जगावर वर्चस्व निर्माण करण्याची स्पर्धा निर्माण झाली शीतयुद्ध हे शस्त्रविरहित असते रशिया अमेरिका या दोन्ही महासत्ता विविध देशांशी लष्करी करार करत होती आपली विचारप्रणाली भांडवलशाही (अमेरिका) साम्यवाद (रशिया) श्रेष्ठ कशी हे दाखविण्यासाठी सतत कार्यरत होते.

थोडक्यात शीतयुद्ध म्हणजे दोन सत्ता गटांमधील युद्धसदृश्य परिस्थिती होय शीतयुद्ध म्हणजे सतत चालणारा संघर्ष.

## (9) अलिप्ततावाद

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांचा उदय झाला होता अमेरिका भांडवलशाहीचा पुरस्कार करणारा देश होता तर रशिया हा साम्यवादी देश होता. दोन्ही महासत्ता जगातील इतर राष्ट्रांना आपल्या गटात सामील करून घेण्यासाठी प्रयत्नशील होत्या. त्यातून त्यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले या काळात आशिया – आफ्रिकेतील बहुतेक देशांनी

वसाहतवादापासून मुक्त होऊन स्वातंत्र्य मिळाले होते देशांचा आर्थिक विकास साधणे हा त्यांचा मुख्य हेतू होता यासाठी महासत्तांच्या सत्तास्पर्धेत सामील न होता अलिप्त राहणे योग्य असे आशिया आफ्रिकेतील देशांना वाटत होते यामुळे अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला गेला

अर्थ

"कोणत्याही सत्तास्पर्धेत किंवा गटात सामील न होता एक स्वतंत्र शक्ती म्हणून जागतिक शांतता व सहकार्य यासाठी प्रयत्न करणे म्हणजे अलिप्ततावाद होय"

वैशिष्ट्ये

1. अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता नव्हे
2. अलिप्ततावाद ही नकारात्मक संकल्पना
3. अलिप्तता म्हणजे निष्क्रियता नव्हे
4. कोणत्याही गटात सामील न होणे
5. अलिप्ततावाद म्हणजे निःपक्ष भूमिका
6. लष्करी गटांपासून अलिप्त

(10) जागतिकीकरण (Globalization)

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय यामध्ये विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचे एकत्रीकरण समाविष्ट आहे थोडक्यात - जगातील सर्व देशांची एकच मोठी बाजारपेठ निर्माण करणारी ही प्रक्रिया आहे जग एकत्र येणे आंतरराष्ट्रीय पातळीवर एका देशातून दुसऱ्या देशात व्यापार, भांडवलशाही प्रवाह तंत्रज्ञान प्रवाह इ. वस्तू व सेवासंबंधी कोणत्याही प्रकारची बंधने न घालणे हे जागतिकीकरणाला अभिप्रेत आहे

'जागतिकीकरण म्हणजे मुक्त स्पर्धा किंवा खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यामुळे उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे "

फायदे ① आर्थिक विकासाला चालना मिळते
② जगातील सर्व राष्ट्रे एकमेकांच्या जवळ येत आहेत
③ गुंतवणूक वाढत आहे
④ विकसनशील राष्ट्रांची आपली स्पर्धाशक्ती वाढविली आहे
⑤ आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळणे आहे
⑥ उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करणे शक्य झाले आहे
⑦ विदेशी चलनाच्या साठ्यात वाढ होत आहे

## (11) स्त्रीवाद (Feminism)

स्त्रियांना समाजात समानतेची वागणूक मिळावी हे स्त्रीवादाचे प्रमुख उद्दिष्ट आहे स्त्रीवाद हा पुरुषप्रधान समाजव्यवस्थे विरुद्ध उठविलेला आवाज आहे थोडक्यात स्त्रीवादाचा अर्थ पुरुषप्रधान समाज व्यवस्थेला विरोध करून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने ~~समान~~ समान दर्जा प्राप्त करून देणे आहे

थोडक्यात - स्त्रीवादाचा अर्थ लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी नष्ट करणे होय

किंवा

स्त्री ही केवळ एक बाई आहे म्हणून लादलेल्या बंधनातून स्त्रियांची मुक्ती करणे

स्त्रीवाद्यांनी प्रारंभीच्या काळखंडापासून स्त्री - पुरुष समानता यावर भर दिलेला आहे लिंगभेदावर आधारित असलेली विषमता समूळातून नष्ट करणे हे स्त्रीवादाचे वैशिष्ट्य आहे स्त्रिया देखील पुरुषांमध्ये समर्थपणे कार्य करू शकतात असे स्त्रीवाद प्रतिपादन करतो स्त्रीवादात स्त्री - पुरुष समानतेवर भर दिलेला आढळतो

(१२) मानवतावाद (Humanism)

दुसऱ्या महायुद्धानंतर २०व्या शतकात युद्ध टाळण्याच्या दृष्टिने प्रयत्नांना सुरूवात झाली तसेच मानवी हक्कांचा विचार होऊ लागला मानवी हक्कांच्या जपणुकीसाठी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली या प्रयत्नातून मानवतावाद संकल्पनेचा विकास झाला व अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केला

मानवतावाद या संकल्पनेचा उदय ग्रीक भाषेतून झाला. मानवतावाद ही एक विचारप्रणाली असून ती मानव या घटकावर भर देते. मानवतावादामध्ये मानवी स्वभावाचा विचार केला जातो मानवी भावनांकडे लक्ष दिले जाते मानवतावाद मानवी हक्कांचा आणि लोकशाहीचा पुरस्कार करतो

मानवी समस्या केवळ मानवच सोडवू शकतो या विचारातून मानवतावादाचा उदय झाला सुरूवातीच्या काळात समाजसेवेशी मानवतावादाची सांगड घालण्यात आली. लोकशाही, मुक्त शासनप्रणाली, मानवाधिकार, पर्यावरण संरक्षण दारिद्र्यनिर्मुलन इ. गोष्टींना मानवतावादामध्ये प्राधान्य देण्यात आले

अल्बर्ट आईनस्टाईन यांनी मानवतावादाचा पुरस्कार केला

१९व्या आणि २० व्या शतकात अनेक संघटनांनी मानवतावाद चालना दिली

(१) ब्रिटिश ह्युमानिस्ट असोसिएशन
(२) अमेरिकन ह्युमानिस्ट असोसिएशन